## प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

# प्रकरण एक : प्रास्ताविक


१.१ विषय प्रवेश.

१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन.

१.३ संशोधन समस्येचे महत्व.

१.४ संशोधनाची उद्दिष्टे

१.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा.

१.६ संशोधन पध्दती.

१.७ प्रकरणीकरण.

१.८ समारोप.

## १.१ विषय प्रवेश

अध्यापन प्रक्रिया मानवी वंशाइतकीच जुनी आहे. परंतु शिक्षक - प्रशिक्षण प्रक्रिया मात्र गेल्या दोन शतकापासून हळूहळू विकसित झालेली दिसून येते. अशा शिक्षक - प्रशिक्षणातून कुशल शिक्षक तयार करणे ही अपेक्षा असते. यासाठी पदवी परीक्षेनंतरचा एक वर्षाचा अभ्यासक्रम (व्यावसायिक) तयार करण्यात आला. बहुउद्देशीय शाळांसाठी शिक्षकांची तत्परतेने गरज भागविणेसाठी एक वर्षाचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला. या पारंपारिक प्रशिक्षणाचा विद्यार्थ्याला शैक्षणिक दृष्टिकोन प्राप्त करुन देणे हा उद्देश होता. परंतु, हा दृष्टिकोन प्राप्त करुन देण्यासाठीचा जो उमेदवारी कालखंड आहे त्यातून त्याला अध्यापन व इतर कौशल्य प्राप्त करणेसाठी पुरेशी संधी मिळत नाही. म्हणूनच माध्यमिक शिक्षण आयोगाने (१९७२-७३) उमेदवारी कालखंड अधिक असावा यासाठी दीर्घ कालावधीच्या एकात्मिक शिक्षक - प्रशिक्षण कार्यक्रमाची शिफारस केली. ही शिक्षक - प्रशिक्षण पध्दती परदेशात विशेषतः प्रगत देशात राबविली जात होती. आधुनिक भारताची गरज भागविण्यासाठी माध्यमिक स्तरावर बहुउद्देशीय शाळांमधील अभ्यासक्रमामध्ये प्रात्यक्षिक कार्याचा अंतर्भाव केला पाहिजे असे १९७२-७३ च्या आयोगाने सुचविले. अशा शाळांमधून पात्र व अनुभवी शिक्षकांची गरज निर्माण झाली. त्यामुळे शिक्षण मंत्रालयाने चार प्रादेशिक प्रशिक्षण महाविद्यालयांची स्थापना केली (Regional Colleges of Education - RCE) व यामार्फत चार वर्षाच्या एकात्मिक बी.ए.बी.एड्. अभ्यासक्रमाची सुरुवात झाली. या अभ्यासक्रमाचे सुरुवातीस बी.ए.बी.एड्. स्पेशल असे नांव होते. प्रशिक्षणार्थ्याला कोणत्याही दोन विषयाची बी.ए. ची पदवी व बी.एड्. ची पदवी प्राप्त होत असे. परंतु, १९८७ पासून या अभ्यासक्रमात सुधारणा करुन प्रशिक्षणार्थ्याला कोणत्याही एका विषयाची बी.ए. ची पदवी व शिक्षणशास्त्र पदवी अशी संयुक्त पदवी

प्राप्त होऊ लागली म्हणूनच त्याला "एकात्मिक अभ्यासक्रम" हे नांव दिले गेले.

या बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणासाठी प्रवेश घेणारा विद्यार्थी बारावी उत्तीर्ण असावा लागतो. या प्रशिक्षणार्थ्याला बी.ए. चे सर्व पेपर व बी.एड्. चे पाच पेपर असा अभ्यासक्रम चार वर्षात पूर्ण करावयाचा असतो. या शिक्षणक्रमामध्ये प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला दोन अध्यापक पध्दती निवडाव्या लागतात. पण हा विद्यार्थी विषय निवडीच्या बाबतीत तितकासा चोखंदळ दिसून येत नाही. या शिक्षणक्रमात प्रवेश घेतल्यानंतर अध्यापन पध्दती निवडत असताना अपुऱ्या ज्ञानामुळे तो प्रशिक्षणार्थी योग्य ती अध्यापन पध्दती निवडू शकत नाही. या दोन अध्यापन पध्दती कोणत्या निवडावयाच्या या संभ्रमात प्रशिक्षणार्थी असतात. बरेचसे प्रशिक्षणार्थी मराठी, इतिहास अशासारख्या अध्यापन पध्दती निवडताना दिसतात. आज बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातून अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी कोणतेही निश्चित नियम लावले जात नाहीत. प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रथम वर्षाच्या गुणांवरुन अध्यापन पध्दती निवडू देणे, मराठी विषयज्ञान पाहण्यासाठी तोंडी अथवा लेखी परीक्षा घेणे यासारख्या मार्गांचा अवलंब होताना दिसत नाही.

मातृभाषेचे अध्यापन कुशलपणे करण्यासाठी सक्षम शिक्षक तयार करणे ही आजची गरज आहे. मराठीच्या कुशल शिक्षकाकडे जे अनेक गुण असावयास पाहिजेत त्यापैकी महत्त्वाचा एक गुण म्हणजे त्याचे विषयज्ञान. मात्र 'मराठी अध्यापन पध्दती' देताना या गुणाकडे लक्ष दिले जात नाही. संशोधिकेची अशी धारणा आहे की, मराठी भाषेचे आवश्यक ज्ञान ही मराठी अध्यापन पध्दती देताना एक अनिवार्य अट मानण्यात यावी. साहजिकच मराठी भाषेचे आवश्यक ज्ञान जाणून घेण्यासाठी एखादे साधन उदा. एखादी कसोटी तयार करणे अपरिहार्य आहे. या गरजेतूनच

संशोधिकेने 'मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपयुक्तता पाहणे' हा विषय निवडला.

१९७३ मध्ये विल्सन टेलर यांनी गद्याच्या उताऱ्याच्या वाचनीयतेचे मूल्यमापन करण्याचे वस्तुनिष्ठ साधन म्हणून "Cloze Test" हा शब्द वापरला. उताऱ्यातील स्वैररित्या शब्द वगळून प्रयोज्यांना भरण्यास सांगितले, त्या यशस्वीयतेची पातळी ही त्या उताऱ्याच्या सहजतेचे सूचक म्हणून वापरली जात असे. टेलरची अनुबंध घटकाची मूळ कल्पना गेस्टॉल्टच्या रिक्त जागा भरण्याच्या मानवी मनाच्या नैसर्गिक वृत्तीवर आधारित आहे. अनुबंध तंत्रामध्ये तर्क, अंदाज केला जातो. निवडलेल्या उताऱ्यातील वगळलेल्या शब्दांच्या जागी परीक्षार्थीने शब्द भरुन त्या उताऱ्याला अर्थ प्राप्त करुन दयायचा असतो. हे एक विशेष कौशल्य असते आणि ते कोणाला जमू शकते ?

अनुबंध कसोटीद्वारा वाचन व लेखन कौशल्याची चाचणी घेता येते. तसेच ऐकणाऱ्याचे कौशल्य सुध्दा या पध्दतीच्या चाचणीद्वारा तपासता येते. अनुबंध कसोटीसाठी निवडलेला उतारा हा सलगता असणारा, योग्य लांबीचा व योग्य काठिण्यपातळीचा असावा. या उताऱ्यातील पहिले वाक्य व शेवटचे वाक्य हे पूर्ण असले पाहिजे. तसेच हे वाक्य कोणत्याही प्रकारची मोडतोड न करता जसे आहे तसेच ठेवावे लागते. दुसऱ्या वाक्यापासून प्रत्येकी निश्चित केलेला रिक्त स्थानाचा क्रमांक वगळावा आणि रिकाम्या जागा ठेवण्याची ही पध्दती शेवटपर्यन्त ठेवावी. वगळलेला शब्द आशयशब्द किंवा रचनाशब्द असू शकतो. आशयशब्द किंवा रचनाशब्द यांची समान संधी प्राप्त व्हावी म्हणून पाच पेक्षा कमी अंतराचा किंवा दहानंतरचा शब्द वगळणे हे चाचणी करताना व्यवहार्य ठरते. तथापि, सातवा शब्द वगळणे हे संशोधनाने मान्य केलेले आहे.

अनुबंध कसोटी ही भाषिक कौशल्याची वस्तुनिष्ठ चाचणी असल्याने यात व्यक्तिनिष्ठतेला वाव नाही. अगदी बरोबर भरलेल्या शब्दाला एक गुण, व्याकरणदृष्ट्या, रचनात्मक दृष्टया आणि उताऱ्याला अनुरुप शब्दालाही एक गुण, वाक्यरचनेच्या दृष्टीने उपयुक्त पण व्याकरणदृष्ट्या बरोबर नसेल तर अर्धा गुण व कोणत्याही दृष्टीने परिपूर्ण नसेल तर शून्य गुण अशा प्रकारची गुणदान योजना करता येईल.

रॉकेन आणि जॉन बॉम्युर्थ ही दोन नांवे कसोटीचा विकास करण्यात महत्वाची आहेत. अनुबंध कसोटी संबंधीचे सर्व संशोधन हे इंग्रजी विषयामध्ये झालेले आहे. परंतु १९७२ पासून पुढे इतर भाषांकरिता ही पध्दती वापरली जाऊ लागली. आजपर्यन्त शिवाजी विद्यापीठांतील कु.प्रभावती पाटील, श्री. एस्. के.सावंत, श्री.कुलकर्णी एस्. व्ही. यांचे इंग्रजी विषयांतर्गत संशोधन झालेले आहे. अलिकडेच शिक्षणशास्त्र विषयात सौ.पाटील एल्. एस्. यांनी शोधप्रबंध सादर केलेला आहे. बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात अध्यापन पध्दती निवडण्यास निश्चित नियम लावले जात नसल्याने मराठीचे अध्यापन कुशलपणे करणारे शिक्षक निर्माण होण्याच्या दृष्टीने संशोधिकेने अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपयुक्तता तपासून तिची सप्रमाणता सिध्द करणे हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## १.२ संशोधन समस्येचे शब्दांकन.

विषय प्रवेशातील विवेचनाच्या आधारे प्रस्तुत संशोधन समस्येचे शब्दांकन पुढीलप्रमाणे केलेले आहे.

"बी.ए.बी.एड्. एकात्मिक अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपयुक्तता तपासून तिची सप्रमाणता सिध्द करणे."

संशोधन हे एक शास्त्रीय अभ्यास कार्य आहे. शास्त्रीय अभ्यासात संज्ञा एका विशिष्ट अर्थाने वापराव्या लागतात. तसेच संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट व्हाव्यात एवढ्यासाठी प्रस्तुत संशोधनाच्या समस्येच्या विधानात वापरलेल्या महत्वाच्या विविध संज्ञांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

**बी.ए.बी.एड्. -**

हा बारावी उत्तीर्ण झाल्यानंतरचा चार वर्षाचा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमामध्ये कला शाखेकडील बी.ए. आणि शिक्षणशास्त्र शाखेकडील बी.एड्. या दोन्ही पदव्या एकदमच दिल्या जातात.

**एकात्मिक अभ्यासक्रम -**

या शिक्षणक्रमामध्ये बी.ए. अर्हता प्राप्त करण्यासाठी द्यावे लागणारे आठ पेपर व शिक्षणशास्त्र शाखेकडील पाच पेपर यांचा चार वर्षाच्या कालावधीसाठी तयार केलेला एकत्रित अभ्यासक्रम म्हणजे एकात्मिक अभ्यासक्रम.

एक वर्षाच्या बी.एड्. अभ्यासक्रमात मात्र शिक्षणशास्त्र शाखेकडील पाच विषयांचाच अभ्यासक्रम तयार केलेला असतो.

**मराठी अध्यापन पध्दती -**

बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्याला त्याने प्रथम वर्षी निवडलेल्या दोन भाषेच्या पेपरमधील कोणताही एक विषय भाषा अध्यापन पध्दती म्हणून निवडावी लागते. तसेच सामाजिक शास्त्राकडील एक अध्यापन पध्दती अशा दोन अध्यापन पध्दती निवडाव्या लागतात. त्यातील मराठी ही एक अध्यापन पध्दती.

**निवड -**

बी.ए.बी.एड्. अभ्यासक्रमात द्वितीय वर्षासाठी ज्या पाच अध्यापन पध्दती आहेत (मराठी, हिन्दी, इंग्रजी, इतिहास, भूगोल) त्यापैकी कोणत्याही दोन अध्यापन पध्दती घेणे म्हणजेच त्यांची निवड करणे.

**अनुबंध कसोटी -**

भाषा विषयक आकलन किती आहे हे जाणून घेण्यासाठी अनुबंध कसोटी हे एक मूल्यमापनाचे साधन म्हणून वापरली जाते. अध्यापन पध्दती निवडत असताना प्रशिक्षणार्थ्यांचे मराठी भाषेवरील प्रभुत्व कसे आहे हे जाणून घेण्यासाठी १७ ते २० रिक्त जागा असलेला एक सलग उतारा देण्यात येतो. त्यातील रिक्त जागा एका विशिष्ट क्रमांकाने दिलेल्या असतात. या रिक्त जागा मूळ दिलेल्या उताऱ्यात लेखकांनी वापरलेल्या मूळशब्दांचा प्रयोग करुन भरावयाच्या असतात. यावरुन प्रशिक्षणार्थ्यांच्या भाषिक कौशल्याचा विकास कितपत झाला आहे याचे मूल्यमापन करणे सोपे जाते.

अनुबंध कसोटीचा अर्थ, रचना, विकास या विषयी एक संपूर्ण प्रकरणच (प्रकरण दुसरे अनुबंध कसोटी, पृष्ठांक ) आहे. येथे त्याचा अधिक ऊहापोह केलेला नाही.

**उपयुक्तता -**

द्वितीय वर्षाकरिता मराठी अध्यापन पध्दतीची निवड करण्यासाठी ही कसोटी उपयुक्त आहे का? असल्यास किती प्रमाणात आहे हे पाहणे म्हणजेच कसोटीची उपयुक्तता ठरविणे होय. अनुबंध कसोटीची उपयुक्तता कशी तपासणार याचे सविस्तर विवेचन संशोधनाच्या कार्यपध्दतीत केलेले आहे.

**सप्रमाणता सिध्द करणे -**

सप्रमाणता, वस्तुनिष्ठता, विश्वसनीयता, पर्याप्तता, सुलभता, भेदभावक्षमता हे चांगल्या कसोटीचे निकष आहेत. त्यापैकी सप्रमाणता हा एक निकष आहे. एखादया कसोटीद्वारे ज्या क्षमतेचे मापन करावयाचे असेल त्याच क्षमतेचे मापन अचूकपणे होत असेल तर ती कसोटी सप्रमाणित आहे असे म्हणता येईल.

सदर शोधप्रबंधात अनुबंध कसोटी म्हणून जो उतारा वापरण्यात येणार आहे अथवा त्यासारखे इतर उतारे मराठी अध्यापन पध्दती

निवडीसाठी उपयुकत ठरत असतील तर ती कसोटी सप्रमाण आहे असे म्हणता येईल. अनुबंध कसोटीच्या सप्रमाणता सिध्द करण्याच्या पध्दतीचे सविस्तर विवेचन संशोधनाच्या कार्यवाहीमध्ये केलेले आहे.

## १.३ संशोधन समस्येचे महत्व

एखादी विशिष्ट भाषा माझी मातृभाषा आहे म्हणून या भाषेचे अध्यापन मी चांगल्या तऱ्हेने करु शकेन हा विश्वास गैरसमजावर आधारलेला आहे. भाषा वापरणे आणि भाषा शिकविणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. याशिवाय शिक्षणाच्या आधुनिकीकरणामुळे, भाषाशास्त्र व मानसशास्त्र ह्या दोन शास्त्रांमधील प्रगतीमुळे आणि शिक्षणावर येऊन पडणाऱ्या वाढत्या जबाबदारीमुळे मातृभाषेच्या अध्यापनाचे क्षेत्रदेखील विस्तृत व गुंतागुंतीचे होत आहे. भाषा शिक्षकाला या गोष्टीची जाणीव असणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे निखळ शब्दसंग्रह म्हणजे भाषा म्हणता येणार नाही त्याप्रमाणे एखादे कौशल्य म्हणजे संपूर्ण भाषिक वर्तन समजता येणार नाही. ऐकणे, वाचणे, बोलणे, लिहिणे या भाषिक कौशल्यांच्या एकत्रिकरणानंतरच समग्र भाषिक अनुभव तयार होतो. भाषिक अध्यापनाच्यावेळी यांचा उपयोग केला तर भाषिक अनुभवाची सर्वंकषता वाढत जाते याची कल्पना शिक्षक प्रशिक्षणार्थ्याला हवी.

"इंग्रजी, गणित, विज्ञान" या विषयांच्या अध्ययनाला विशेष बुध्दिमत्ता लागते पण मराठी विषयाचे तसे नाही, या विषयाचे वाचन करुन कोणालाही तयारी करता येते. अशी सर्वसाधारण समजूत खरं तर गैरसमजूत असलेली दिसून येते. मातृभाषेविषयी जराही प्रेम नाही. आदर नाही असे प्रशिक्षणार्थीही मराठी अध्यापन पध्दती निवडताना दिसतात. प्रत्येक राज्यात मातृभाषा ही राजव्यवहाराची भाषा बनली असली तरी आजही प्रशिक्षणार्थ्यांच्या बोलण्यात सतत इंग्रजी शब्द येत असतात.

यावरुनच त्यांचे मातृभाषेविषयीचे ज्ञान, प्रेम व आस्था याविषयीची बेफिकिरी दिसून येते.

आपल्याला मराठी विषयाचा कुशल शिक्षक व्हायचे आहे अशी भावना प्रशिक्षणार्थ्यांमध्ये आढळत नाही. प्रशिक्षणार्थ्यांजवळ भाषाप्रभुत्व असेल तरच विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, भाषणातील चुका त्याला समजावून सांगता येतील. भाषा शिक्षकाला शुध्द, स्पष्ट, अस्खलितपणे बोलता आले पाहिजे. वयोगटानुसार भाषा वापरण्यात योग्य तो बदल करता आला पाहिजे. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला शिक्षकी पेशाबद्दल आणि तो शिकवित असलेल्या विषयाबद्दल प्रेम, निष्ठा, जिव्हाळा असणे आवश्यक आहे. पण वस्तुस्थिती मात्र तशी दिसून येत नाही.

आजचा मराठीचा प्रशिक्षणार्थी मराठी विषयाच्या अभ्यासाच्या बाबतीत कमी पडतो. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. त्याचे साहित्याचे वाचन इतके कमी असते की, वर्गात एखादया पाठाविषयी थोडीही माहिती सांगण्यास तो असमर्थ ठरतो. ऐतिहासिक, सामाजिक, पौराणिक, वैज्ञानिक, राजकीय व अन्य संदर्भ शिक्षकाला सांगता येत नाहीत. शब्दकोश, चरित्रकोश, ज्ञानकोश, संस्कृतीकोश, मराठी वाङ्.मयाचा इतिहास, साहित्याचे समालोचन,साहित्य कृतींचे रसग्रहण, परीक्षण मराठीच्या शिक्षकाने अभ्यासलेले नसते. जुजबी मार्गदर्शके, टिपणे यांच्या आधारे विषयाची कशीतरी तयारी केलेला शिक्षक विषयाला किंवा विद्यार्थ्यांना न्याय देऊ शकत नाही. कवितेचा कसा तरी अर्थ सांगणे आणि गद्य पाठ वाचून दाखविणे यापलीकडे शिक्षकाची मजल जात नाही. केवळ ओळी शिकवावयाच्या नसतात तर दोन ओळींच्या, दोन शब्दांच्यामध्ये असलेल्या रिकाम्या जागेत जो मतितार्थ दडलेला असतो; जो विद्यार्थी वाचू शकत नाही, तो मराठीच्या अध्यापकाने शिकविणे गरजेचे असते.

मराठी भाषा ही मातृभाषा असल्यामुळे ती कोणीही शिकवू शकतो हा एक गैरसमज आहे. मराठी विषयात शिकविण्यासारखे आहे तरी काय

असे म्हणणाऱ्यांची संख्या दुर्लक्ष करण्याजोगी नाही. मराठी विषय कोणताही शिक्षक शिकवू शकतो हा अपसमज आहे व ह्या अपसमजापोटी बहुसंख्य प्रशिक्षणार्थी मराठी अध्यापन पध्दती निवडतात.

बी.ए.बी.एड्. शिक्षणप्रणालीमध्ये अध्यापन पध्दती निवडत असताना कोणत्याही प्रकारचे निकष लावले जात नाहीत. त्यामुळे बोलण्यास, लिहिण्यास, वाचण्यास व शिकविण्यास सोपी वाटली म्हणून प्रशिक्षणार्थी या अध्यापन पध्दतीची निवड करतात. परंतु मराठी विषयाचे अपुरे व तुटपुंजे ज्ञान असल्यामुळे हे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना यथायोग्य माहिती देऊ शकत नाहीत. यातूनच कुशल शिक्षक निर्माण होण्यास अडथळा येतो.

परीक्षेत मराठी विषयात चांगले गुण पडले की, विद्यार्थ्यांना वाटते माझी मराठी भाषा चांगली आहे. मराठी भाषेवर माझे प्रभुत्व आहे. विद्यार्थ्यांच्या भाषा प्रभुत्वाचे मूल्यमापन करण्यासाठी ज्या चाचण्या वापरल्या जातात त्यात पाठ्यपुस्तकातील, पाठ्यक्रमाव्यतिरिक्त इतर लेखकांच्या पुस्तकातील परिच्छेद, तसेच टीपा, निबंध यासारखे प्रश्न असतात. या परीक्षांमध्ये पाठांतर शक्तीवर जास्त भर असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे यात भाषिक कौशल्य दिसत नाही. पाठांतर केलेले परीक्षेत आले तर चांगले गुण पडतात व न आल्यास कमी गुण पडतात अशी स्थिती आढळते. विद्यार्थ्यांच्या भाषा प्रभुत्वाचे मूल्यमापनासाठी आपण अनुबंध कसोटीचा उपयोग करु शकतो.

एखादया विद्यार्थ्याकडे विशिष्ट भाषिक कौशल्ये आहेतच असे विश्वसनीयरित्या सांगता येत नाही. दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेत व्याकरणात चांगले गुण पडले तरी इतर प्रश्नात चांगले गुण असतीलच असे नाही. यावरुन असे दिसते की, काही विद्यार्थ्यांना व्याकरणाचे प्रश्न चांगले सोडविता आले तरी इतर प्रश्न चांगले सोडविता येत नाहीत. यासाठी विद्यार्थ्यात भाषिक कौशल्याचा विकास कितपत झाला आहे, त्यांचा मराठीचा शब्दसंग्रह कसा आहे? विद्यार्थी कोणती

पुस्तके वाचतात? (अवांतर वाचन) हे पाहण्यासाठी या कसोटीचा आपण उपयोग करु शकतो.

या अनुबंध कसोटीमुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या वार्षिक परिक्षेमधील गुणांमध्ये देखील प्रगती जाणवेल. अशा पध्दतीने प्रात्यक्षिक व सैध्दांतिक कामात तो प्रशिक्षणार्थी कुशल बनेल. मराठी अध्यापन पध्दती घेऊन बी.ए.बी.एड्.चे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणारा प्रशिक्षणार्थी एक चांगला मराठीचा अध्यापक बनेल. परिणामी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून जर असे कुशल अध्यापक अध्यापन करु लागले तर एकंदरीत मराठी विषयाच्या अध्यापनाचा दर्जाच सुधारणेस ह्या अनुबंध कसोटीद्वारे मदत होईल.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्टे आहेत.

१. दोन अध्यापन पध्दतींपैकी एक मराठी अध्यापन पध्दती निवडणाऱ्या प्रशिक्षकांसाठी प्रवेश कसोटी तयार करणे.

२. या अनुबंध कसोटीची उपयुक्तता तपासणे.

३. या अनुबंध कसोटीची सप्रमाणता सिध्द करणे.

## १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

**संशोधनाची व्याप्ती -**

बी.ए.बी.एड्. अभ्यासक्रम ज्याठिकाणी आहे तेथे अध्यापन पध्दती निवडण्यासाठी ही कसोटी उपयुक्त ठरेल.

**संशोधनाच्या मर्यादा -**

हे संशोधन शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या बी.ए.बी.एड्. महाविद्यालयापुरतेच मर्यादित आहे. ही महाविद्यालये पुढीलप्रमाणे -

अ) महावीर महाविद्यालय, (बी.ए.बी.एड् विभाग) कोल्हापूर.

ब) कर्मवीर हिरे आर्टस्, कॉमर्स, सायन्स ॲन्ड एज्युकेशन कॉलेज, गारगोटी.

हे संशोधन बी.ए.बी.एड् महाविद्यालयातील द्वितीय वर्षातील मराठी अध्यापन पध्दतीची निवड केलेली आहे. अशा प्रशिक्षणार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

## १.६ संशोधन पध्दती

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडित असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दती वापरली आहे. या समस्येच्या संदर्भात वर्णनात्मक सांख्यिकी परिमाणे वापरुन सद्यस्थिती कोणती हे जाणून घेण्यासाठी ही संशोधन पध्दती उपयोगी ठरणार आहे. या पध्दतीच्या आधारे मिळालेल्या सामग्रीचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण व मूल्यांकन करता येईल आणि चांगल्या बदलासाठी योग्य मार्गदर्शन करता येईल.

अ) साधने -

या संशोधनासाठी लागणारी सामग्री गोळा करण्यासाठी अनुबंध कसोटी, तज्ज्ञ अध्यापकांच्या मुक्त स्वरुपाच्या मुलाखती व प्रश्नावली या साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

१) मुलाखत -

"संशोधनाविषयी प्रत्यक्ष माहिती मिळविण्याचे एक उत्तम व प्रभावी साधन म्हणजे मुलाखती. पूर्व नियोजित मुद्दयांवर आधारित दिलेल्या उत्तराद्वारे वैध व विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी समोरासमोर बसून केलेले संभाषण म्हणजे मुलाखती होय."[६] अनुबंध कसोटीची सप्रमाणता प्रस्थापित करण्यासाठी मराठी विषयाचे तसेच मराठी अध्यापन पध्दतीचे अध्यापन करणारे या दोहोमध्ये तज्ज्ञ असलेल्या अध्यापकांच्या मुलाखती घेण्यात येतील. मुलाखतीद्वारा त्यांची मते, विचार अभिप्राय अनुबंध कसोटीच्या उतारा निवडीबाबत घेतली जातील.

२) प्रश्नावली -

प्रश्नावलीत संशोधन वस्तुसंबंधीच्या मोजक्या, लिखीत व पूर्वनियोजित प्रश्नांना उत्तरे प्राप्त केली जातात. एकाच प्रकारचा प्रश्नसंच प्रत्येकाला सारख्याच परिस्थितीत सोडवायला दिल्याने प्रश्नावली नियंत्रित, वस्तुनिष्ठ व गटाच्या मुलाखतीसारखी असते, वरील पध्दतीप्रमाणे प्रश्नावली तयार करुन मराठी विषयाच्या प्राध्यापकांना दिली जाईल व यातूनच अनुबंध कसोटीचा उतारा निवडलेला आहे.

३) अनुबंध कसोटी -

अनुबंध कसोटीचा उतारा द्वितीय वर्षात मराठी अध्यापन पध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना देण्यासाठी योग्य असल्याची दहा विषय तज्ज्ञांच्या मुक्त मुलाखती व प्रश्नावलीद्वारे खात्री करुन घेतली जाईल. हा उतारा द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी सप्रमाणित केलेला असेल. या उताऱ्यात १७ ते २० शब्द ठराविक अंतराने गाळलेले असतील. अशा गाळलेल्या जागा मराठी अध्यापन पध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांकडून भरुन घेतल्या जातील. त्यांनी भरलेल्या उत्तरांवरुन त्यांनी निवडलेली मराठी अध्यापन पध्दती योग्य आहे की अयोग्य आहे हे सुचविले जाईल.

वरील विविध साधनांद्वारे जी माहिती गोळा केली जाईल तिची वेळोवेळी नोंद करुन त्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण, योग्य मांडणी करुन वस्तुस्थितीचे स्वरुप स्पष्ट केलेले आहे.

ब) नमुना निवड -

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारा नमुना संपूर्ण जनसंख्येकडून गोळा केलेला आहे. जनसंख्येत सर्व घटकांचा अंतर्भाव असतो. महावीर महाविद्यालय बी.ए.बी.एड् विभाग, कोल्हापूर व कर्मवीर हिरे आर्टस्, कॉमर्स, सायन्स ॲन्ड एज्युकेशन कॉलेज, गारगोटी येथील द्वितीय वर्षात मराठी अध्यापन पध्दती निवडलेले प्रशिक्षणार्थी.

संशोधन पध्दती व कार्यवाही याविषयी एक स्वतंत्र प्रकरणच (पहा प्रकरण क्र.४ पृष्ठांक ) असल्यामुळे येथे संशोधन पध्दती व कार्यवाही याविषयी अधिक ऊहापोह केलेला नाही.

## १.७ प्रकरणीकरण

वर वर्णन केलेल्या साधनांच्या सहाय्याने संकलित केलेल्या सामग्रीचे विश्लेषण, वर्गीकरण करुन आवश्यक तेथे सांख्यिकी परिमाणे वापरुन अन्वयार्थ लावलेला आहे. तसेच अन्वयार्थावर आधारित निष्कर्ष काढून शिफारशी केलेल्या आहेत. या सर्वांचे पुढीलप्रमाणे सहा प्रकरणात विभाजन केलेले आहे.

**प्रकरण - १ - प्रास्ताविक**

या प्रकरणात वाचकाला संशोधन विषयाशी परिचित करुन देण्यात आलेले आहे. ही समस्या कशी निर्माण झाली याचा ऊहापोह करणेत आलेला आहे. तसेच संशोधन समस्येचे शब्दांकन करुन प्रस्तुत संशोधनाच्या विधानात वापरलेल्या महत्वाच्या विविध संज्ञांचे स्पष्टीकरण केले आहे आणि संशोधनाचे महत्व त्याची व्याप्ती व मर्यादा व संशोधनाची उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. संशोधन पध्दती व विविध प्रकरणांचा ऊहापोह केलेला आहे. थोडक्यात हे प्रकरण संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करते.

**प्रकरण - २ - अनुबंध कसोटी**

या प्रकरणात अनुबंध कसोटीचा अर्थ, महत्व, वैशिष्टचे यांचा ऊहापोह केलेला आहे.

**प्रकरण - ३ - संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा आढावा**

या प्रकरणात संशोधन समस्येशी संबंधित अशा प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथाचे, लेखांचे, प्रबंधांचे समालोचन केले आहे. या विषयाशी संबंधित कोणते संशोधन झालेले आहे? कोणती सामग्री गोळा करण्यात आली आहे? त्या सामग्रीचे वर्णन करुन कोणता अन्वयार्थ लावलेला आहे?

कोणते निष्कर्ष काढण्यात आले? कोणत्या शिफारशी केल्या आहेत. याविषयी ऊहापोह करण्यात आला आहे.

**प्रकरण - ४ - संशोधन पध्दती**

या प्रकरणात संशोधनासाठी कोणत्या पध्दतीचा उपयोग केला आहे. त्यासाठी नमुना निवड कशी केली. संशोधनासाठी कोणती साधने वापरली? याची विस्तृत माहिती देण्यात आली आहे.

**प्रकरण - ५ - संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

या प्रकरणात संशोधनासाठी वापरलेल्या विविध साधनांद्वारे संशोधिकेने मिळविलेल्या माहितीचे संकलन करुन त्यातून योग्य अर्थ काढण्यासाठी त्याची पुनर्रचना केली आहे. तसेच संकलित सामग्रीची तपासणी, वर्गीकरण व विश्लेषण करुन अर्थनिर्वचन केलेले आहे.

**प्रकरण - ६ - निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणामध्ये संकलित केलेल्या आधार सामग्रीचे वर्गीकरण, विश्लेषण करुन अन्वयार्थ लावल्यानंतर त्या आधारे कोणते निष्कर्ष निघतात ते स्पष्ट करुन त्यावर आधारित शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे प्रस्तुत संशोधन करताना संशोधिकेला जाणविणाऱ्या व अशा प्रकारच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

## १.८ समारोप

सदर प्रकरणात प्रस्तुत शोधप्रबंधाची पार्श्वभूमी विशद करण्यासाठी योग्य असा आराखडा दिलेला आहे. त्यात संशोधनाची पार्श्वभूमी, संशोधन समस्येचे शब्दांकनासाठी वापरलेल्या पदाचा अर्थ - व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, मर्यादा आणि प्रकरणीकरण इत्यादींची चर्चा केली आहे. या प्रकरणांमुळे प्रस्तुत संशोधनाची विस्तृत तपशीलवार कल्पना येण्यास व

तिच्या संशोधन पध्दतीने संशोधनाची उकल होण्यास मदत व्हावी अशी अपेक्षा आहे.

प्रकरण दोन मध्ये अनुबंध कसोटीची वैशिष्टये, विकास, कार्य, गुणदान योजना यांचा ऊहापोह केलेला आहे.

# संदर्भ


१) अकोलकर, ग. वि., पाटणकर, ना. वि. - "मराठीचे अध्यापन" (पूणे - व्हीनस प्रकाशन, १९७०)

२) बापट, भा. गो. - "शैक्षणिक संशोधन" (पूणे - नूतन प्रकाशन, १९८९.)

३) करंदीकर, सुरेश - "मराठी अध्यापन पध्दती" (कोल्हापूर - फडके प्रकाशन, १९९६)

४) कुंडले, म. बा. - "मराठीचे अध्यापन" (पूणे - श्रीविद्या प्रकाशन)

५) पाटणकर, ना. वि., पाटील, लीला - "मराठीचे अध्ययन आणि अध्यापन" (पूणे - व्हीनस प्रकाशन, १९७०)

६) मुळे, रा. श., उमाठे, वि. तु. - "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे" (नागपूर - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, १९८७.) पृष्ठ १९१

७) माळी, एम्. जी. - "शैक्षणिक प्रश्न पुनर्रचना आणि राष्ट्रविकास" (पूणे - निळकंठ प्रकाशन, १९७०.)

८) वाळंबे, मो. रा. - "सुगम मराठी व्याकरण लेखन" (पुणे - नितिन प्रकाशन, १९९०.)

९) सराफ, रा. सो. - "भाषा, मातृभाषा आणि परभाषा" (पुणे - श्रीविद्या प्रकाशन, १९७२.)